**नि.फौ.ख.क्र.१९/२०१८**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २**
**निशाणी क्र. २३**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – आशा लिंबराज कराड
**वय** – ३४ वर्षे **धंदा** – गृहिणी
**राहणार** – शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे**

१. मी कुडाळ येथे २०१६ ते २०२२ पर्यंत राहण्यास होते. माझ्या पतीचे लिंबराज कराड असे आहे. माझ्या मुलांची नांवे विश्वराज व श्रावणी अशी आहेत. आमचे एवढेच कुटुंब आहेत. २०१७ साली मी गृहिणी होते. तसेच, मी स्पर्धा परीक्षांची तयारी करत होते. दि.१५.०३.२०१७ साली मी कुडाळ बाजारात ५ वाजता गेले होते. त्याठिकाणी मला वर्षा कांबळे व मंगल कांबळे या दोघी भेटल्या. ते मला म्हणाले की, विजय अर्जून नलावडे हे त्यांच्या ओळखीचे असून ते आय.डी.बी.आय. बँकेत डीओ म्हणून काम करतात. तसेच, त्यांनी असे सांगितले की, त्या दोघी कुडाळला मतिमंद मुलांच्या शाळेत शिक्षिका आहेत. त्या दोघी म्हणाल्या की, विजय अर्जून नलावडे हे परिक्षेचे मार्गदर्शन करुन ट्रेनिंग देवून नोकरी मिळवून देतात. त्या दोघी कोठे काम करतात याची मी खात्री केली व त्या शिक्षिका आहेत का याचीदेखील खात्री केली. त्या दोघींनी मला सांगितले की, मला ट्रेनिंगसाठी मुंबईला राहण्यासाठी चाळीस हजार रुपये भरावे लागतील. त्यांनी सांगितले की, ट्रेनिंग दिल्यानंतर नोकरी मिळेल, कारण ते तयारी करुन घेणार आहेत. दि.२०.०३.२०१७ रोजी मी व माझे पती वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याकडे आपुलकी मतिमंद शाळा, कुडाळ याठिकाणी सकाळी ६ वाजता गेलो. त्याठिकाणी विजय अर्जून नलावडे, वर्षा कांबळे व मंगल कांबळे हे होते. वर्षा कांबळे यांनी विजय नलावडे यांच्यासोबत माझी ओळख करुन दिली. त्या दोघींनी मला सांगितले की, हे विजय अर्जून नलावडे असून आय.डी.बी.आय. बँकेत अधिकारी आहेत. विजय अर्जून नलावडे यांनी माझ्याकडे १० वी व १२वीची मार्कलिस्ट, बोर्ड सर्टिफिकेट,

आधार कार्ड व दोन फोटो मागितले. मी त्यांना हे कागदपत्र कशासाठी हवे आहेत असे विचारले असता त्यांनी सांगितले की, फॉर्म भरण्यासाठी लागतात. तेव्हा मी त्यांना म्हणाले की, फॉर्म तर ऑनलाईन भरला जातो. तेव्हा ते म्हणाले की, आयडीबीआय बँकेचा फॉर्म ऑफलाईन आहे. माझा लिपीक पदाचा आयडीबीआय बँकेत फॉर्म भरायचा होता. मी त्यांना म्हणाले की, फॉर्म मी भरते व डॉक्युमेंट मी जोडते. तेव्हा ते म्हणाले की, नाही आता उशीर झाला आहे, तुम्ही डॉक्युमेंट आणून द्या, फॉर्म आम्हीच भरतो व डॉक्युमेंट आम्हीच भरतो. मी डॉक्युमेंट आणले. तेव्हा ते म्हणाले की, आता जागा कमी आहेत, तेव्हा तुम्ही लगेच पैसे भरा. मी घरी गेले व लगेच पैसे घेवून आले व मोजण्याकामी त्या तिघांकडे पैसे दिले. त्या तिघांनी पैसे मोजले. ते पैसे चाळीस हजार रुपये दिले होते. पैसे दिले त्यावेळी मी, माझे पती, तसेच विजय अर्जून नलावडे, वर्षा कांबळे व मंगल कांबळे या हजर होत्या. सदरचे पैसे मी आपुलकी मतिमंद शाळा, कुडाळ याठिकाणी दिले होते. पैसे दिल्यानंतर मला त्यांना असे विचारावे वाटले की, परीक्षा वगैरे कधी असते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, २०.०५.२०१७ रोजी परीक्षा असेल व दि.१८.०५.२०१७ ला मोबाईलवर मेसेज येईल. मी ते मला मुंबईला ट्रेनिंगला घेवून जायची वाट पहात होते. पण ते ट्रेनिंगला घेवून गेले नाहीत. परीक्षा जवळ आली होती. दि.१८.०५.२०१७ रोजी मला मेसेज आला नाही. म्हणून मी वर्षा कांबळे यांना दि.१९.०५.२०१७ रोजी फोन केला. वर्षा कांबळे यांचा फोन नंबर ९७६४२४३८१९ असा होता. (साक्षीदाराने सदरचा मोबाईल नंबर बघून सांगितला.) तेव्हा त्यांनी मला फोनवर सांगितले की, परिक्षेचे हॉलतिकीट आलेले नाही, डायरेक्ट परीक्षाच आहे. परीक्षेची तारीख २०.०५.२०१७ अशी सांगितली. त्यांनी मला परीक्षा ही आयडीबीआय बँक, बीकेसी सेंटर, बांद्रा, मुंबई येथे आहे असे सांगितले. त्यानंतर मी वर्षा कांबळे यांना म्हणाले की, हॉलतिकीट पोस्टात जावून आणावे लागेल का, त्यावर त्या म्हणाल्या की, त्यांनी पोस्टमनला सांगितले आहे की, सर्व हॉलतिकीट त्यांच्याकडे आणून द्या. त्यानंतर मी पोस्टमनला त्याबाबत विचारले असता पोस्टमन म्हणाले की, वर्षा कांबळे यांनी त्याबाबत काहीही सांगितले नाही. पोस्टमन कुडाळचे होते पण त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. पोस्टमन त्यावेळेस मला म्हणाले की, तुमचं परीक्षेचे हॉलतिकीट असेल तर तुम्ही पोस्ट कार्यालयात जावून या, तेथे परीक्षेच्या हॉलतिकीट संदर्भात अगोदरच ८ दिवस रजिस्ट्रेशन असते. मी त्यावेळेस १९.०५.२०१७ ला १ वाजता पोस्टात गेले. त्यावेळेस आम्ही त्यांना विचारले की, रजिस्ट्रेशन वगैरे आहे का, त्यावेळी त्यांनी रजिस्ट्रेशन नाही असे सांगितले. त्यानंतर मी वर्षा कांबळे यांना म्हणाले की, पोस्टात परिक्षेच्या हॉलतिकीटबाबत कुठलेही रजिस्ट्रेशन नाही. तेव्हा त्या म्हणाल्या की, आता

तुम्ही २०.०५.२०१७ रोजी ११ वाजता परिक्षेला डायरेक्ट मुंबईला या. वर्षा कांबळे, मंगल कांबळे, माझे पती व मी असे दि.१९.०५.२०१७ ला संध्याकाळी ११:३० वाजता मुंबईला जाण्यासाठी खाजगी गाडीने निघालो. तसेच त्या गाडीत व इतर दुसऱ्या गाडीतपण त्या परीक्षेला जाण्यासाठी विद्यार्थी होते. त्या परिक्षेला राहुल वारागडे, सुनिल पांडागळे, प्रसन्न पवार, साधना पवार व इतर २५ विद्यार्थी होते. आम्ही आयडीबीआय बँक, बीकेसी सेंटर येथे सकाळी ०६ वाजता पोहोचलो. आम्ही त्याठिकाणी विचारणा केल्यावर बँक ९ वाजता उघडते असे समजले. ९ वाजेपर्यंत बाहेर बसा असे आम्हाला सांगितले. बँकेचे अधिकारी ९ वाजता आले. इतके विद्यार्थी बघून त्यांनी आमच्या सर्वांकडे चौकशी केली की, का आले म्हणून. तेव्हा आम्ही त्यांना म्हणालो की, लिपीक पदासाठी आयडीबीआयची परीक्षा आहे त्याकरीता आम्ही आलेलो आहोत. त्यांनी विचारले की, तुम्हाला कोणी पाठवले, तुम्ही कसे काय आलात. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की, विजय अर्जून नलावडे यांनी आमचे फॉर्म भरुन घेतलेले आहेत व त्यांनी आम्हाला परिक्षेला यायचे असे सांगितलेले आहे. आम्ही त्यांना सांगितले की, ते आयडीबीआय बँकेत डीओ पदावर आहेत. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले की, असे कोणीही विजय अर्जून नलावडे आमच्या बँकेत कामाला नाही. आम्ही त्यांना विनंती केली ते कोणत्या शाखेत आहेत त्याची तपासणी करा. त्यांनी तपासणी केली तेव्हा त्यांनी विजय अर्जून नलावडे हे आयडीबीआय बँकेच्या कुठल्याच शाखेत कामाला नाहीत असे सांगितले. आम्हा सर्वांना माहित झाले की, फसवणुक झालेली आहे. कोणाचे किती पैसे गेलेत याची सर्वांनी चर्चा केली. आम्ही चर्चा करत असताना वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी आम्हाला धमकी दिली की, आम्ही तुमचे पैसे परत करु. तुम्ही जर केस केली तर आम्ही ॲट्रॉसिटीची केस तुमच्यावर करु, तुम्हाला महागात पडेल. आम्ही त्या दोघींना पोलीस स्टेशनला घेवून जाणार होतो, परंतू त्या दोघी आमच्यासोबत पोलीस स्टेशनला आल्या नाहीत. त्या दोघींनी बाजूला जावून मंत्रालयात कोणाला तरी फोन केला व त्या मंत्रालयात गेल्या. आम्ही सर्व आपापल्या घरी आलो. आम्ही २०.०५.२०१७ रोजी आम्ही मुंबईतून निघालो व दि.२१.०५.२०१७ रोजीच्या सकाळ होण्याच्या आत आम्ही घरी आलो. तक्रार देण्यासाठी २१.०५.२०१७ रोजी प्रसन्न पवार, राहुल वारागडे हे दोघेजण कुडाळ पोलीस स्टेशनला गेले होते. तेथून पुढे काय झाले ते मला माहित नाही. दि.०६.०६.२०१७ रोजी मी मेढा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. आता मला सदरची तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यात लिहिलेला मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **फिर्यादीस निशाणी क्र.२४** देण्यात येत आहे. आरोपी वर्षा कांबळे व मंगल कांबळे वारंवार आम्हाला ॲट्रॉसिटीची धमकी देत असल्यामुळे आम्हाला

तक्रार द्यायला उशीर झाला. आम्ही चाळीस हजार रोख दिले होते. मी आरोपी विजय नलावडे, वर्षा कांबळे, मंगल कांबळे यांना पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी कोर्टात वर्षा कांबळे व मंगल कांबळे या हजर आहेत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती.पी.डी.गोरे यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

२. माझे शिक्षण बी.एस.सी. झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कुडाळमध्ये ५–६ वर्ष राहण्यास असल्यामुळे मला तिथली आजूबाजूची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुडाळमध्ये आपुलकी मन मंदिर शिक्षण संस्था आहे. कुडाळमध्ये सांजवात अशी शिक्षण संस्था आहे का ते मला माहित नाही. माझे बी.एस.सी. झाल्यामुळे मला इंग्रजी व मराठी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही नोकरीकरीता जाहिरात दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, जाहिरातीमध्ये किती पदे रिक्त आहेत, पगार किती आहे, नेमणूकीच्या अटी व शर्ती नमूद असतात. मी त्यावेळी आयडीबीआय बँकेची जाहीरात वाचली होती. मी पोलीसांना जाहिरात क्रमांक दिला नव्हता. बँकेच्या कार्यक्षेत्राबाबत मला माहिती नाही. मी जेव्हा आमची फसवणुक झाली हे माहित झाले तेव्हा बीकेसी, बांद्रा याठिकाणी पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या वाहनाने गेले त्याच्या चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. सदर चालकाचे नाव तुफान काळे हे होते. सदरची गाडी ही खन्ना डांगे यांची होती. त्या गाडीचा क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर ते कुडाळ पोलीस स्टेशन हे पायी १० मिनीटांचे अंतरावर. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर ते मेढा पोलीस स्टेशन हे वाहनाने जायचे झाल्यास २५ मिनीटांचे अंतरावर. वर्षा व मंगल यांचे संपूर्ण नांव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणी व्यक्तीने किती रुपये दिले ते मला व्यक्तीशः सांगता येणार नाही. कुठल्याही व्यक्तीला पैसे दिल्यास त्याची आपण पोहोच घेतो. मी जे चाळीस हजार रुपये दिले त्याची पोहोच त्यांच्याकडून घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे कागदपत्र दिले होते त्याचीदेखील पोहोच घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना पैसे न दिल्यामुळे मी त्यांच्याकडून पोहोच घेतलेली नाही. खबरी जबाब पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे घेतलेला आहे. माझ्या सरतपासातील मजकूर *त्या दोघींनी मला सांगितले की, मला ट्रेनिंगसाठी मुंबईला राहण्यासाठी चाळीस हजार रुपये भरावे लागतील. त्यांनी सांगितले की, ट्रेनिंग दिल्यानंतर नोकरी मिळेल, कारण ते तयारी करुन घेणार आहेत. दि.२०.०३.२०१७ रोजी मी व माझे पती वर्षा कांबळे व मंगल कांबळे*

*यांच्याकडे आपुलकी मतिमंद शाळा, कुडाळ याठिकाणी सकाळी ६ वाजता गेलो. त्याठिकाणी विजय अर्जून नलावडे, वर्षा कांबळे व मंगल कांबळे हे होते.विजय अर्जून नलावडे यांनी माझ्याकडे १० वी व १२वीची मार्कलिस्ट, बोर्ड सर्टिफिकेट, आधार कार्ड व दोन फोटो मागितले. मी त्यांना हे कागदपत्र कशासाठी हवे आहेत असे विचारले असता त्यांनी सांगितले की, फॉर्म भरण्यासाठी लागतात. तेव्हा मी त्यांना म्हणाले की, फॉर्म तर ऑनलाईन भरला जातो. तेव्हा ते म्हणाले की, आयडीबीआय बँकेचा फॉर्म ऑफलाईन आहे. माझा लिपीक पदाचा आयडीबीआय बँकेत फॉर्म भरायचा होता. मी त्यांना म्हणाले की, फॉर्म मी भरते व डॉक्युमेंट मी जोडते. तेव्हा ते म्हणाले की, नाही आता उशीर झाला आहे, तुम्ही डॉक्युमेंट आणून द्या, फॉर्म आम्हीच भरतो व डॉक्युमेंट आम्हीच भरतो. मी डॉक्युमेंट आणले. तेव्हा ते म्हणाले की, आता जागा कमी आहेत, तेव्हा तुम्ही लगेच पैसे भरा. मी घरी गेले व लगेच पैसे घेवून आले व मोजण्याकामी त्या तिघांकडे पैसे दिले. त्या तिघांनी पैसे मोजले. ते पैसे चाळीस हजार रुपये दिले होते* मी पोलीसांना सांगितला होता, परंतू तो माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. कारण पोलीसांनी सगळयांनाच थोडी थोडी माहिती विचारली होती. माझ्या सरतपासातील मजकूर *पैसे दिल्यानंतर मला त्यांना असे विचारावे वाटले की, परीक्षा वगैरे कधी असते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, २०.०५.२०१७ रोजी परीक्षा असेल व दि.१८.०५.२०१७ ला मोबाईलवर मेसेज येईल. मी ते मला मुंबईला ट्रेनिंगला घेवून जायची वाट पहात होते. पण ते ट्रेनिंगला घेवून गेले नाहीत. परीक्षा जवळ आली होती. दि.१८.०५.२०१७ रोजी मला मेसेज आला नाही. म्हणून मी वर्षा कांबळे यांना दि.१९.०५.२०१७ रोजी फोन केला. वर्षा कांबळे यांचा फोन नंबर ९७६४२४३८१९ असा होता. (साक्षीदाराने सदरचा मोबाईल नंबर बघून सांगितला.) तेव्हा त्यांनी मला फोनवर सांगितले की, परिक्षेचे हॉलतिकीट आलेले नाही, डायरेक्ट परीक्षाच आहे. परीक्षेची तारीख २०.०५.२०१७ अशी सांगितली. त्यांनी मला परीक्षा ही आयडीबीआय बँक, बीकेसी सेंटर, बांद्रा, मुंबई येथे आहे असे सांगितले. त्यानंतर मी वर्षा कांबळे यांना म्हणाले की, हॉलतिकीट पोस्टात जावून आणावे लागेल का, त्यावर त्या म्हणाल्या की, त्यांनी पोस्टमनला सांगितले आहे की, सर्व हॉलतिकीट त्यांच्याकडे आणून द्या. त्यानंतर मी पोस्टमनला त्याबाबत विचारले असता पोस्टमन म्हणाले की, वर्षा कांबळे यांनी त्याबाबत काहीही सांगितले नाही. पोस्टमन कुडाळचे होते पण त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. पोस्टमन त्यावेळेस मला म्हणाले की, तुमचं परीक्षेचे हॉलतिकीट असेल तर तुम्ही पोस्ट कार्यालयात जावून या, तेथे परीक्षेच्या हॉलतिकीट संदर्भात अगोदरच ८ दिवस रजिस्ट्रेशन असते. मी त्यावेळेस १९.०५.२०१७ ला*

*१ वाजता पोस्टात गेले. त्यावेळेस आम्ही त्यांना विचारले की, रजिस्ट्रेशन वगैरे आहे का, त्यावेळी त्यांनी रजिस्ट्रेशन नाही असे सांगितले. त्यानंतर मी वर्षा कांबळे यांना म्हणाले की, पोस्टात परिक्षेच्या हॉलतिकीटबाबत कुठलेही रजिस्ट्रेशन नाही. तेव्हा त्या म्हणाल्या की, आता तुम्ही २०.०५.२०१७ रोजी ११ वाजता परिक्षेला डायरेक्ट मुंबईला या* मी पोलीसांना सांगितला होता, परंतू तो माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. कारण पोलीसांनी ते व्यवस्थित न लिहिल्यामुळे माझ्या जबाबात नाही. माझ्या सरतपासातील मजकूर *इतके विद्यार्थी बघून त्यांनी आमच्या सर्वांकडे चौकशी केली की, का आले म्हणून. तेव्हा आम्ही त्यांना म्हणालो की, लिपीक पदासाठी आयडीबीआयची परीक्षा आहे त्याकरीता आम्ही आलेलो आहोत. त्यांनी विचारले की, तुम्हाला कोणी पाठवले, तुम्ही कसे काय आलात. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की, विजय अर्जून नलावडे यांनी आमचे फॉर्म भरुन घेतलेले आहेत व त्यांनी आम्हाला परिक्षेला यायचे असे सांगितलेले आहे. आम्ही त्यांना सांगितले की, ते आयडीबीआय बँकेत डीओ पदावर आहेत. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले की, असे कोणीही विजय अर्जून नलावडे आमच्या बँकेत कामाला नाही. आम्ही त्यांना विनंती केली ते कोणत्या शाखेत आहेत त्याची तपासणी करा. त्यांनी तपासणी केली तेव्हा त्यांनी विजय अर्जून नलावडे हे आयडीबीआय बँकेच्या कुठल्याच शाखेत कामाला नाहीत असे सांगितले* मी पोलीसांना सांगितला होता, परंतू तो माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. माझ्या सरतपासातील मजकूर *आम्ही चर्चा करत असताना वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी आम्हाला धमकी दिली की, आम्ही तुमचे पैसे परत करु. तुम्ही जर केस केली तर आम्ही ॲट्रॉसिटीची केस तुमच्यावर करु, तुम्हाला महागात पडेल. आम्ही त्या दोघींना पोलीस स्टेशनला घेवून जाणार होतो, परंतू त्या दोघी आमच्यासोबत पोलीस स्टेशनला आल्या नाहीत. त्या दोघींनी बाजूला जावून मंत्रालयात कोणाला तरी फोन केला व त्या मंत्रालयात गेल्या* मी पोलीसांना सांगितला होता, परंतू तो माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. माझ्या सरतपासातील मजकूर *आरोपी वर्षा कांबळे व मंगल कांबळे वारंवार आम्हाला ॲट्रॉसिटीची धमकी देत असल्यामुळे आम्हाला तक्रार द्यायला उशीर झाला* मी पोलीसांना सांगितला होता, परंतू तो माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेले मी सर्व खोटे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जो व्यवहार केला होता तो विजय नलावडे यांच्यासोबत केला होता. साक्षीदार सांगतो की, तिघांसोबत व्यवहार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांना

खोटया केसमध्ये फसवण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मंगल कांबळे यांच्या अंगावर धावून गेले होते व त्यांच्यात बाचाबाची झाली होती त्याचा राग मनात धरुन खोटी केस केलेली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : ०२.११.२०२३

रविंद्र भ. खवले,

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**